आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२९ ऑगस्ट २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राज्याच्या दौऱ्यावर, वाढवण बंदरासह विविध विकासकामांचा करणार प्रारंभ
- महाराष्ट्र हे देशाचं विकास इंजिन असून जीडीपीत सर्वाधिक वाटा देत असल्याचंमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचं प्रतिपादन
- मुंबईच्या वांद्रे टर्मिनसपासून मडगावला जाणाऱ्या नव्या एक्सप्रेस गाडीचं उद्घाटन

**आणि**

- शेअर बाजारात तेजी, सेन्सेक्स आणि निफ्टी सार्वकालिक उंचीवर

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राज्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. ते सकाळी ११ वाजता मुंबईतल्या जिओ कन्व्हेंशन सेंटरमध्ये  ग्लोबल फिन्टेक फेस्टचं उद्घाटन करणार आहेत. पेमेंटस कौन्सिल ऑफ इंडिया, नॅशनल पेमेंटस कॉर्पोरेशन ऑफ इंडिया आणि फिनटेक कन्व्हर्जन्स कौन्सिल यांनी हा महोत्सव आयोजित केला आहे. त्यानंतर सुमारे दीडच्या सुमाराला पालघरच्या सिडको मैदानावर त्यांच्या हस्ते विविध विकासकामांचं उद्घाटन आणि भूमिपूजन होणार आहे. पालघर इथं डहाणू गावात ते ७६ हजार कोटी रूपयांच्या वाढवण बंदराचं भूमिपूजन करणार आहेत. वाढवण हे भारतातल्या सगळ्यात मोठ्या बंदरांपैकी एक म्हणून विकसित केलं जाणार आहे. ते आंतरराष्ट्रीय जलमार्गांशी थेट जोडलं जाणार असल्यामुळे वेळ आणि खर्चाची बचत होईल. अद्ययावत तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांनी हे बंदर सज्ज केलं जाईल.

प्रधानमंत्री एक हजार ५६० कोटी रुपयांच्या २१८ मत्स्यपालन प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणीही करणार आहेत. त्यामुळे देशभरात या क्षेत्रात पाच लाख

रोजगाराच्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यांच्या हस्ते ३६० कोटी रूपयांच्या नौका संपर्क प्रणालीचं उद्घाटन होईल. ही प्रणाली इस्रोनं विकसित केली आहे. त्यामुळे समुद्रात गेलेल्या मच्छिमारांशी संपर्क साधता येणार असून त्यांच्या सुरक्षेची हमी मिळणार आहे. मासेमारी बंदर, एकात्मिक ॲक्वा पार्क अशा प्रकल्पांचंही उद्घाटन ते करतील.

**<><><><><>**

वाढवण बंदर महाराष्ट्रासोबत देशाची वेगळी ओळख निर्माण करायला मदत करेल असा विश्वास केंद्रीय बंदर, नौकानयन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज व्यक्त केला. वाढवण बंदराचं उद्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते भूमिपूजन होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर ते पालघर इथं आयोजित वार्ताहर परिषदेत बोलत होते.

आशिया खंडातलं हे सर्वात मोठं बंदर असेल आणि जगातल्या आघाडीच्या १० बंदरामध्ये याचा समावेश होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आत्मनिर्भर भारताच्या दिशेनं वाटचाल करताना हे बंदर एक महत्वाची भूमिका बजावेल, असं ते म्हणाले. या बंदरामुळे १२ लाख लोकांना प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरीत्या रोजगार मिळेल, असं सोनोवाल यांनी सांगितलं. स्थानिकांशी चर्चा करून राज्य सरकारच्या नियमांनुसार त्यांना मोबदला दिला जाईल तसंच रोजगारासाठी आवश्यक कौशल्यं स्थानिक युवकांना शिकवली जातील, अशी माहिती केंद्रीय बंदर, जलमार्ग आणि नौवहन, सचिव टी. के. रामचंद्रन यांनी दिली.

**<><><><><>**

महाराष्ट्र हे देशाचं विकास इंजिन असून गेल्या दोन वर्षात महाराष्ट्राचा जीडीपीतला वाटा सर्वाधिक आहे असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. ते खाजगी वृत्तवाहिनीला दिलेल्या विशेष मुलाखतीत बोलत होते. आपलं सरकार रात्रंदिवस काम करत असून घरात बसून सरकार चालवता नाही येत,

त्यासाठी जनतेशी संपर्कात राहिलं पाहिजे, असं ते म्हणाले. राज्याची एक ट्रिलियनची अर्थव्यवस्था असून शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आपलं सरकार उपाययोजना करतं असल्याचं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण इथं राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या दुर्घटनेनंतर शिवप्रेमींसह संपूर्ण महाराष्ट्रातून संताप व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आज मुंबईत 'आत्मक्लेश' मूक आंदोलन करण्यात आलं. चेंबूर इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर एक आंदोलन झालं तर दुसरं आंदोलन जुहुमध्ये करण्यात आलं. यावेळी आंदोलकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दोषीवर कारवाई करण्याचं निवेदन दिलं.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्हात मालवण इथं राजकोट किल्ल्यावरचा छत्रपती शिवाजीमहाराजांचा पुतळा कोसळण्यामागची कारणं शोधण्यासाठी तसंच एकूणच या घटनेसंदर्भात विस्तृत कारणमीमांसा करण्यासाठी संयुक्त तंत्रज्ञ समिती नेमण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आहे. या समितीत बांधकाम अभियंते, आयआयटी मुंबईचे प्रतिनिधी, तसंच नौदलाच्या प्रतिनिधींचा समावेश असेल. याखेरीज राजकोटमधेच छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा नव्याने उभारण्यासाठी देशातले नामवंत शिल्पकार, अभियंते, तज्ञ आणि नौदलाचे प्रतिनिधी यांची तज्ञ समिती नेमण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले आहेत.

दरम्यान, पुतळा कोसळल्याच्या घटनेचा निषेध म्हणून आज नाशिकमधे पाथर्डी फाटा इथं आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आंदोलन केलं. याप्रकरणी शासनाने घेतलेल्या भूमिकेबाबत देखील तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

<><><><>

मालवणजवळ राजकोट इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ काल आयोजित निषेध मोर्चाच्यावेळी दोन गटांमधे झालेल्या संघर्ष प्रकरणी ४२ जणांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.

<><><><>

मुंबईच्या वांद्रे टर्मिनस पासून मडगावला जाणारी नवी एक्सप्रेस गाडी आजपासून सुरू झाली. केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयुष गोयल यांनी या गाडीला हिरवा झेंडा दाखवून ही गाडी रवाना केली. या कार्यक्रमाला रेल्वे, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव हे दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते. गणेशोत्सवासाठी विशेष गाडी असावी या स्थानिकांच्या मागणीवरून ही रेल्वे गाडी सुरू झाली आहे. यावेळी आशिष शेलार, प्रवीण दरेकर यांच्यासह भाजपचे नेते आणि रेल्वेचे अधिकारी उपस्थित होते.

मुंबईत रेल्वेचे एकूण १६ हजार २४० कोटी रुपयांचे प्रकल्प झाल्यानं सर्व मुंबईकरांना त्याचा लाभ होईल. महाराष्ट्रात ३४२ गणपती विशेष ट्रेन सुटत आहेत. महाराष्ट्र असाच विकसित होत राहो, असं अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले.

<><><><>

भारतीय शेअर बाजारात आज सेन्सेक्स आणि निफ्टीने या सत्रातला सार्वकालिक उच्चांक गाठला. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज ३४९ अंकाची वाढ झाली आणि तो ८२ हजार १३५ अंकांवर बंद झाला.

राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीत आज १०० अंकांची वाढ झाली आणि तो २५ हजार १५२ अंकांवर बंद झाला.

<><><><>

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी २९ सप्टेंबर पासून पुन्हा बेमुदत उपोषण करण्याचा निर्धार आज आंतरवाली सराटी इथं जाहीर केला. गेल्या

वर्षी २९ ऑगस्ट याच दिवशी जालना जिल्ह्यातल्या आंतरवाली सराटीमधून त्यांनी आंदोलन सुरू केलं होतं.

या आंदोलनाच्या वर्षपूर्तीनिमित्त त्यांनी आज आंदोलक समन्वयकांची आंतरवाली इथं बैठक बोलावली होती. त्यावेळी मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत हे उपोषण सुरूच राहील असं ते म्हणाले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही जरांगे यांनी टीका केली.

<><><><><>

केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे येत्या १ सप्टेंबरला सीडीएस म्हणजेच संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा आयोजित करण्यात आली असून ही परीक्षा सकाळी ९ ते ११, दुपारी १२ ते २ आणि ३ ते ५ या वेळेत घेण्यात येईल. तर एनडीए परीक्षा सकाळी १० ते साडेबारा आणि दुपारी २ ते साडेचार या वेळेत घेण्यात येईल.

<><><><><>

भारत स्टार्टअप उद्योगांची मांदियाळी असल्याचं केंद्रीय इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान राज्य मंत्री जितिन प्रसाद यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत डिजिटल भारत इकॉनॉमी कॉन्क्लेव्हला ते संबोधित करत होते. ते म्हणाले की गेल्या १० वर्षात दर ४० मिनिटांनी एक या वेगानं स्टार्टअप उद्योग देशात सुरु झाले आहेत. एकूण एक लाख ४० हजार स्टार्टअप्स पैकी किमान ४५ टक्के उद्योगांचं नेतृत्व महिलांकडे आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रकल्पांसाठी अर्थसंकल्पात १० हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद असल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

आंध्रप्रदेशात विशाखापट्ट्णम इथं पाकिस्तानच्या हेरगिरीप्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेने देशभरात विविध ठिकाणी छापे टाकले. गुजरात, कर्नाटक, केरळ, तेलंगण, उत्तरप्रदेश, बिहार, आणि हरयाणामधे मिळून १६ ठिकाणी ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईत २२ मोबाईल फोन्स, आणि अनेक गोपनीय कागदपत्रं मिळाली असल्याचं एएनआयने सांगितलं. भारतीय नौदलासंबंधी महत्वाची आणि गोपनीय माहिती चोरणं आणि भारत विरोधी कारस्थान करणं या आरोपांखाली एनआयए ने गेल्यावर्षी दोन जणांवर आरोपपत्र दाखल केलं आहे.

**<><><><><>**

सांगलीतल्या पोलीस अधीक्षक कार्यालयात केंद्रीय संचार ब्युरो आणि सांगली पोलीस यांच्यातर्फे नव्या भारताचे नवीन कायदे या विषयावर आधारित चित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं. अत्यंत चांगल्या पद्धतीनं मराठी भाषेत कायद्यांविषयी माहिती दिली असून तिन्ही कायदे सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या असल्याचं या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

येत्या २ दिवसांत कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात विदर्भात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह जोरदार पावसाची शक्यता आहे.

**<><><><><>**